Vol 3 Issue 10 July 2014

ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies,
Sri Lanka

## Welcome to Review Of Research

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Dr. T. Manichander

## *Advisory Board*

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

Review Of Research
Vol. 3 | Issue. 10 | July. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X

Available online at www.ror.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# बा.सी. मर्ढेकर : नवकवितेचे जनक

*प्रा.डॉ. आय. जे. तांबोळी*

*प्रमुख, मराठी विभाग , एस.एस.ए. आर्टस् अॅन्ड कॉमर्स कॉलेज, सोलापूर.*

### प्रास्ताविक :–

माणूस आपलं जीवन एक सुंदर काव्य व्हावं म्हणून धडपतो, या धडपीत त्याला कडूगोड अनुभव वळणावळणावर भेटत जातात. कधी त्याला वेदनांची काटेरी झुडपं लागातात तर कधी त्याला प्रतिकूल परिस्थितीच्या रणरणत्या उन्हात न्हावं लागतं. पुढे जाऊन तो स्वतःला जेव्हा न्याहाळू लागतो, तेव्हा काटे बोचून निघालेले रक्ताचे थेंब दवबिंदू वाटतात आणि रणरणत्या उन्हाचं चांदण झालेलं दिसतं. आणि त्याला वाटतं 'आत्ताच' खऱ्या अर्थानं आपलं जीवन सुंदर काव्य झालं आहे.' म्हणूनच जीवनाचा प्रवास हा काव्याचा प्रवार आहे. जगणं आणि मरणं यातील वाट आहे. अशा ह्या काव्याच्या प्रवासात मराठी कविता तीन वळणांनी प्रवास करीत असलेली दिसते. ही वळणं बदलत्या कालप्रवृत्तीइतकेच बदलत्या कलाप्रवाहांचेही आहेत. मध्ययुगीन काव्यात ध्ये परमार्थाचे होते, आधुनिक काव्यात ऐहिक मूल्यांचे तर, नवकवितेत संमित्र स्वरुपाचे आहे. म्हणजेच नवकवितेला मुलभूत मूल्याधिष्ठित अधिष्ठान नाही. इथे नवकवितेचे आणि त्यांचे जनकत्व ज्यांना दिले गेले आहे. अशा बा.सी. मर्ढेकरांच्या काव्याचा परामर्ष आपणाला घेता येईल.

### नवकवितेचे जनक :–

कोणत्याही वाङ्मयीन संस्कृतीत आधुनिक अथवा नवकवीचा मान मिळण्यासाठी त्या कवीची प्रतिभ विविधांगी असावी लागते. त्याला सखोल आत्मभान असावे लागते. नव जुन्याचे मंथन करुन एक वेगळेच नवनीत निर्माण करावे लागते. तेव्हा अनेकमुखी कविता जन्माला येते. असा कवी शतकाने जन्माला येत असतो. असा केशवसुता नंतर जन्माला आलेला नवकवी म्हणजे बी.सी. मर्ढेकर. म्हणूनच त्यांना 'नवकवितेचे जनक' अथवा 'दुसरे केशवसुत' संबोधण्यात येते.

मर्ढेकरांनी नवकवितेच्या प्राचीन व अर्वाचीन परंपरा नव्यादृष्टींनी पाहिल्या आणि जीवनातील सर्वकष अंधारला, विरुपतेला, अभद्रतेला आजच्या युगाच्या परिभाषेतून भेदकपणे वाचा फोडली. मर्ढेकरांची कवता केशवसुतांप्रमाणेच जितकी आत्मनिष्ठ; तितकीच ती सभोवतालच्या सामाजिक व अन्य परिस्थितीशी तन्मय पावली होती. म्हणूनच त्यांच्या कवितेत आजच्या युगातील दाहक जीवनानुभवाचा अंश जाणवतो.

शरश्वंद्र मुक्तिबोध आपल्या 'नवी मळवाट' या काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत लिहितात, केशवसुतांपासून मर्ढेकरांपर्यत बाह्य जगाशी कवीचा संवाद चालू होता. पण मर्ढेकरांनी व त्या परंपरेतील कवींनी हा संवाद बंद केला. सौंदर्यतत्व, व्यक्तीनिठता व अभिव्यक्ती विलक्षणता ही तीन वैशिष्ट्यो मर्ढेकरांपासून आजच कवींनी घेतलेली आहेत. ''यावरुन मर्ढेकरांचे जनकत्व आणि त्यांचा आजच्यानवकवींवर पडलेला प्रभाव सिध्दत

माणसाची 'पिपात मेलेल्या ओल्या उंदीरासारखी अवस्था' 'मी एक मुंगी तू एक मुंगी' यासारखी निरर्थकता, 'कुणी मरावे, कुणी जगावे खाऊनि दगड' अशी अपररिहार्यता किंवा 'जगायची पण सक्ती आहे मरायचीपण सक्ती आहे' अशी मनाची व्दिधा अवस्था, संतप्त उद्रेकाच्या आणि वासनेनं बरबटलेल्या विकृतींची निदर्शक असणारी कविता, मर्ढेकरांच्या प्रतिभेला आविष्कृत करायला लावणारी अशी कोणती परिस्थिती त्यांच्या काळी होती. हे समजून घ्यायला त्यांच्या कवितांच्याच पोटात शिरावे लागेल. त्याशिवाय कळणार नाही.

### मर्ढेकरांच्या कविता :–

'लाखातून एखादा कवी नविन लिहितो बाकीचे सारे नव्यानेच लिहितात' असे म्हटले तर, मर्ढेकर नविन लिहिणारे होते. काव्यातील आशय आणि अभिव्यक्ती यात क्रांतीकारक बदल करुन मर्ढेकरांनी मराठी कवितेचे रुप

बदलेले. परंतु काही तरी बदल करावा ह्या हेतून त्यांनी कविता केली नाही. हे लक्षात घ्यावे, मर्ढेकरांनी मोजकचं लिहिलं परंतु जे लिहिलं त्याला साहित्य विश्वात तोड नाही. एकंदरीत त्यांच्या चारच काव्यसंग्रह आज उपलब्ध आहेत. त्यांच्या पहिला काव्यसंग्रह 'शिशिरागम'(1939) यात व्यक्तीगत जाणिवाच्या कविता आहेत. (2)'काही कविता' (1947) यात सामाजिक जाणिवाच्या कविता आहेत. मर्ढेकरांना 'नवकवी' म्हणून जी मान्यता मिळाली ती याच काव्यसंग्रहाने आणि अश्लिलतेच्या आरोपावरुन त्यांना अटक झाली ती ही (1950)'याच संग्रहामुळे (3)''आणखी काही कविता' (1951) 'यांत आध्यात्मिक जाणिवाच्या कविता आहेत. (4)'मर्ढेकरांची कविता (समग्र) 1959 हे श्री. पू. भागवतानी वरील तीन काव्यसंग्रह व काही अप्रकाशित कवितांचे संकलन करुन हे काव्यसंग्रह प्रकाशित केले.

***मर्ढेकरांची काव्यनिष्ठा :–***

मर्ढेकरांनी नवकाव्याला दिलेली देणगी म्हणजे 'प्रतिमा' होय. त्यांच्या नवप्रतिमेच्या प्रघातामुळेच आजची समीक्षा सिध्द होताना दिसते मर्ढेकरांची कविता म्हणजे प्रतिमांचे प्रदेश होय. कवितेतील एक मुख्य प्रतिमा त्याच्या अनुषंगाने दुःखमय प्रतिमा आणि त्याला भाषाविष्काराची जोड यातून त्यांची विलक्षण कविता प्रकट होते. त्यांची 'उंदीर' ही प्रतिका मरगळलेल्या माणसाची तर 'हाडांचे सापळे' ही पिचलेल्या शोषीत कामगाराची आहे. तसेच प्रेमाच्या संदर्भातील 'शुक्र' ही प्रतिका इत्यादी या अनुरोधाने लक्षात घेण्यासारखे आहेत. भावगर्भ, कल्पनागर्भ आणि विचारगर्भ आत्मनिष्ठा हीच त्यांच्या कवितातून प्रगट होणारी मूल्ये, आणि यातूनच ते 'वाङ्मयीन महात्मता' सिध्द करतात. हेच त्यांच्या काव्याचे ध्येय होते. 'कविता करणे म्हणजे आत्मसमर्पण करणे होय' असा सूर त्यांच्या सर्वच कवितांतून जाणवतो. म्हणून देवाला उद्देशून म्हणतात.

'कधी लागेल गा नख तुझे माझिया गळ्याला, आणखी काही कविता
आणि सामर्थ्याचा स्वर माझिया गा व्यंजनाला !
आत काही जळत असेल तरच लिहिता येतं. तेंव्हा काय होत ? हे सांगताना लिहितात,
भरुन येईल रदय जेधवा, शरीर पिळूनी निघेल घाम आणखी काही कविता
अन् शब्दांचा तोंडामध्ये बसेल तुझा गच्च लगाम'

मर्ढेकरांचे वैशिष्ट्या म्हणजे त्यांनी आपल्या कवितांना शीर्षके दिली नाहीत. प्रस्तावना आणि समारोप ते कवितांच्या माध्यमाने करत. शिवाय मर्ढेकरांची कविता केवळ शिर्षकाने उलगडावी इतकी एकपदरी नाही. म्हणून ते लिहितात.

'मोडून गेले शीर्षक । हाती आले खिळे'

मर्ढेकरांच्या काळी 'मुक्तधंद' हा नवाप्रयोग सुरु झाला होता. कवी अनिल त्यांचे उद्‌गाते. परंतू मुक्तछंदाचे नाते नवकवितेशी जोडले जाते. ते मर्ढेकरांच्या म्हणण्याप्रमाणे चुकीचे ठरते. रचनातंत्राने मुक्तछंद हे नवे आहे म्हणून त्याला आधुनिक म्हणता येईल. तर काव्यात नवेपण येते ते 'पूर्वी न बांधल्या गेलेल्या अनुभव घटकातून म्हणजे आशयातून' अशी मार्ढेकरांची धारणा होती. यालाच ते 'भावनानिष्ठ समतानता' म्हणतात. उलट मर्ढेकरांनी ओवी–अभंगासारख्या पारंपरिक छंदाचा वापर करुन, सर्वत्र समयक रचना करुन आशयाचे गोळीबंद रुप साकारले आहे. त्यासाठी वेगळी भाषिक मांडणी केली. आणि जुने श्रुतयोजनही नव्या संदभात वापरले.

उदा :– ''देगा हेचि दानं । देवा, माझी हाडे
खाऊनि गिधाडे । तृप्त व्हावी ।।

आधुनिक शैलीविषयक दृष्टीकोन मर्ढेकरांच्या कवितेत दिसते. 'लालित्य किंवा सौंदर्य हे केवळ शैलीमुळे निर्माण होत नसून घाटामुळे निर्माण होते आणि हा घाट येतत तिचतील संवेदना व भावना यांच्या संवादी, विरोधी व समतोल अशा लयबध्द बांधणीतून' असे ते म्हणतात. म्हणूनच ते वाहित्यप्रकारासंदर्भात 'नाममात्रवादी सिध्दांत' मांडतात. नियमोल्लंघन हे शैलीशी निगडीत असेल तर मर्ढेकरांची नियमोल्लंघन शैली खालील कवितांतून दिसून येईल.

'पंक्चरली जरि रात्र दिव्यांनी तरी पंपतो कुणी काळोख'
हसण्याचे जरि वेड लागले, भुंकतात तरि अश्रू चोख'

एवढेच नव्हे तर, विरामचिन्ह, अपसणचिन्ह, संयोगचिन्ह हे सुध्दा कवितेचे मूलद्रव्य मानून त्यांच्या भाषिक उपयोग मर्ढेकरांनी करुन घेतला. त्यामुळे मर्ढेकरांची कविता आशय आणि प्रयोगाने नविन होती.

मर्ढेकरांच्या कवितेत मुख्यत्वेः आढळून येणाऱ्या उपहास–उपरोधीक भाषाशैलीला विडंबन म्हटले गेल. तर प्र. क. अत्रे यांच्या विडंबन प्रेरणेहून खूपच निराळे आहे. अत्रे यांचे विडंबन विषय मर्यादित असून त्यामागील वृत्तीही केवळ

दोषदिग्दर्शन करण्याची होती असे दिसून येईल. परंतु मर्ढेकराच्या उपरोधीक कवितेमागे तुकोबांच्या परखड अभंगातील विधायक संतापाची प्रेरणा दिसून येते. तुकाराम आणि मर्ढेकर यांच्या काव्यामागे एक समान धागा सापडते. तो म्हणज प्रेक्षोभक वृत्ती, अनुभवाशी बेडरपणे प्रामाणिक राहण्याचा बाणेदारपणा, उपहास नि फटकळपणा. तुकोबांचीच परंपरा जणू मर्ढेकर चालवताना दिसतात. या दृष्टीने मर्ढेकरांना 'दुसरे तुकाराम' म्हटले तर अयथार्थ वाटू नये. मर्ढेकरांनी तुकोबांच्या अभंगाचा सांगाडा घेऊन त्यात मात्र भंगलेल्या माणसांचा ओतला आहे.

उदा :— जे न जन्मले वा मेले । त्यांसि म्हणे जो आपुले ।
तोचि मुत्सद्दी जाणाव । देवे तेथे ओळखावा ।।

मर्ढेकरांची कविता विविधांगी आशयानी समृद्ध होती. मर्ढेकरांच्या कवितेबद्दल विंदा करंदीकर म्हणतात, 'मर्ढेकर भावनात्मकतेकडून, विचारात्मकतेकडे, विचारात्मकतेकडून विचारातील जाणिवांकडे प्रवास करणारे!'

### *मर्ढेकरांची जीवननिष्ठा :—*

मर्ढेकरांच्या जीवनावर आणि काव्यावर यंत्रयुगाचा फार मोठा पगडत्त दिसून येतो. आजच्या यांत्रिक युगात 'सौंदर्ययुक्त प्रेम आणि असे प्रेमयुक्त जीवन' कसे लाभेल? त्याचा शोध कुठे घ्यायचा? यंत्रातून निघालेल्या आगीत होरपळलेल्या जीवांच्या आकांतात, युद्धात पडलेल्या मुडद्यांच्या राशीतच या जीवनाचे अंत व्हायचे का? असा प्रश्न आपल्या युद्धकालीन अभंगातून मर्ढेकर उपस्थित करतात.

प्रेमाचे लव्हाळे,
यंत्रातून आग,
सौंदर्य नव्हाळे,
शोधू? विमानाचे हल्ले,
आसपास मुडद्यांची रास, बेचिराख जिल्हे....

त्यापेक्षा हे सगळेच न झालेले काय वाईट आहे. म्हणून ते म्हणतात,

ही पृथ्वीची तिरडी जळो देवा भली

अशा ह्या यंत्रयुगात आपली अवस्था जणू टाकाऊ मालासारखी झाली आहे. तेव्हा प्रेयसीला उद्देशून म्हणतात,

येथील तेव्हा जपून ये तू, ढिसूळ माझ्या पहा बरगड्याा,
आलिंगन तू देता मजला, कडकडूनि ह्या पिचतील निधड्याा
पुढे म्हणतात, पिचलेल्या निधड्याा पाहून मात्र यायच सोडू नको.

मर्ढेकरांनी तत्कालीन समाजजीवनाच्या सर्व क्षेत्रासंबंधीच प्रतिक्रिया व्यक्त केल्या. परंतु त्या सर्वांचे केंद्र एकच होते. ते म्हणजे मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रात दाटलेला अंधार, हा अंधार कधी समुहाच्या तर कधी मी च्या संदर्भात त्यांना प्रत्ययाला आला. ह्यातूनच मर्ढेकरांनी मानवी जीवनाचा क तिमिरोपनिषद लिहिला.

अंधाऱ्या जगाची । हीच रीतभात
काजळाची वात । काळोखाला ।।

अर्धपोटी राहणाऱ्या भिकाऱ्याच्या पोटाची जाणीव जोवर मानवाला होत नाही. त्याची लाज वाटत नाही. तोवर आम्ही नागडेच आहोत अशी भावना मर्ढेकर व्यक्त करतात.

देवा ऐशी भूक । कासया दिलीस । झालो कासावीस ।
मी ही... अर्धवट । जोवरि आहे । ओंगळ समस्त । आम्ही...

समाजाची नाळ तोडलेल्या कवीची ही कविता नक्कीच नाही. हे जर खरे तर, त्याला वरती खाका म्हणण्यात अर्थ नाही.

मर्ढेकरांवर लिंगवादी म्हणून जो आक्षेप घेतला जातो. तो चुकीचा आहे. त्यांनी लिंगवादाच्या पुरस्काराकरिता आपली लेखणी झिजवली नाही. तर पिचलेल्या व निष्ठाशून्य माणसांच्या लैंगिक आसक्तीतील दुबळेपणावर कोरडे ओढले आहेत. त्यांची स्त्रीच्या उदात्त स्वरूपावर असीम श्रद्धा आहे. आईवर अनेकांनी कविता रचल्या परंतु अजू उद्या होणाऱ्या

माऊलीच्या पायाचे तीर्थ घेणारा हा निराळाच आहे.

पोरसवदा होतीस । काल परवा पावेतो ।
थांब उधाचे माऊली । तीर्थ पायाचे घेईतो ।।

त्या अपरंपार शक्तीने उपलब्ध करून दिलेल्या सामग्रीवर माणूस विज्ञानाच्या सहाय्याने, अंहकाराच्या तोऱ्यात त्याच्यावरच मात करू पाहत आहे. परंतु हे सारे व्यर्थ आहे हे सांगताना मर्ढेकर म्हणतात,

नळीतले जग नळीत जगते । उगाच रूसवा रसायनाचा
उगाच दावा मानवतेचा । आणिक डंका सामर्थ्याचा ।।

लिंगवादी, अश्रद्ध, ओंगळ, बीभत्स अशा अनेक आरोपांना पुरुत उरणारी, सगळ्यांना तोंडात बोट घालायला लावणारी त्यांची एकच कविता पुरेशी आहे. ही कविता पसायदानाचे स्मरण करून देण्या इतकी पावन स्वरूपाची असून संतकुळालाच शोभणारी आर्त मागणी श्रीकृष्णापाशी शेवटी त्यांनी केली आहे.

भंगु दे काठिन्य माझे
आम्ल जाऊदे मनींचे,
येउ दे वाणींत माझ्या
सूर तुझ्या आवडीचे.....
जाऊ दे कार्पण्य मी चें,
दे धरूं सर्वांस पोटी

आपल्या बुद्धीला अतींद्रियार्थ आच लागावी असे मागणे मागणारा दे धरू सर्वांस पोटी अशी आशा बाळगणारा आणि हे मागणे असताना अभागी लोकांची आण घेणारा कवी लिंगवादी आणि माणूसव्देषी म्हणून अधिक्षेपिला जावा, हा केवढा दारूण दैवदुर्विलास आहे" मर्ढेकरांच्या कवितेबददल अ.ना. देषपांडे म्हणतात, ते योग्य वाटते.

***समारोप :–***

संमिश्र जाणिवांनी भारलेला, जनमानसाच्या विसंगतीने भरडलेला कवी, आयुष्यभर त्याला दुषणांचा मारा सहन करावा लागला. अशा नवकवीला आपण मांगल्य सूचक नवदृष्टीने बघून ख–या अर्थाने त्याचा सन्मान केला पाहिजे. काळयावरती जरा पांढरे करायला आपले काळेपण सोडले पाहिजे. नाहीतरी कवी म्हणतोच आहे,

" काळयांवरती जरा पांढरे
हया पाप्याच्या हातून व्हावें
फक्त तेधवाः आणि एरव्हीं
हेंच पांढ–यावरती काळे "

***संदर्भग्रंथ सूची***

1) म.वा. धोंड : तरी ही येतो वास फुलांना (1999)
2) विजया राजाध्यक्ष : मर्ढेकरांची कविता स्वरूप आणि संदर्भ (खंड 1 ला) (1991)
3) गो.म. कुलकणी : आधुनिक मराठी कविता : (1991)
4) वा. भा. पाठक : आधु. मराठी कवितेचे अंतःप्रवाह (1964)
5) अ.ना. देशपांडे : (खंड 2 रा) आधु. मराठी वाडमयाचा इतिहासः (1970)
6) बा.सी. मर्ढेकर : सौंदर्य आणि साहित्य, (काव्यातील नविनता लेख) (1975)

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-
413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com